दिनांक :— २४.०७.२०२१

**—: प्रेसनोट :—**

लचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग पडताळणी क्र. ६१/२०२१ व सेलू पोलीस स्टेशन जिल्हा परभणी गु.र.क्र. २३३/२०२१, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील तक्रारदार यांचे मित्राचा अपघाती मृत्यु झालेबाबत दिनांक ०३.०५.२०२१ रोजी सेलू पोलीस ठाणे जि. परभणी येथे गु.र.क्र. १२०/२०२१ भादंवि कलम ३०४ (अ), २७९, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील मयत व्यक्ती याचे पत्नीसोबत यातील तक्रारदार यांचे झालेले मोबाईलवरील संभाषण व्हायरल झाल्याने दिनांक ०९.०७.२०२१ रोजी यातील आलोसे राजेंद्र रामकरण पाल, वय ५५ वर्षे, उपविभागीय पोलीस अधिकारी, सेलू विभाग, जि. परभणी यांनी तक्रारदार यांना त्यांचे कार्यालयात बोलावुन ''तुझी व्हायरल झालेली क्लीप मी ऐकली असुन यातुन तुला बाहेर पडायचे असेल तर मला २ कोटी रुपये दयावे लागतील'' असे बोलून तक्रारदार यांना वारंवार फोन करुन अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन २ कोटी रुपये लाचेची मागणी केली.

तक्रारदार यांना नमुद आलोसे यांना लाच दयावयाची नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयात दिनांक २२.०७.२०२१ रोजी समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मा. वरिष्ठांचे आदेशान्वे सदर तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई** यांना निर्देश देण्यात आले.

त्यानुसार दिनांक २३.०७.२०२१ रोजी तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन आलोसे यांच्या उपविभागीय पोलीस कार्यालय, सेलू, परभणी येथे पडताळणी केली असता, यातील आलोसे राजेंद्र रामकरण पाल, उपविभागीय पोलीस अधिकारी, सेलू विभाग, जि. परभणी यांनी तक्रारदार यांच्याकडे वर नमुद गुन्हयात मदत करण्यासाठी २ कोटी रुपयांची मागणी करुन तडजोडी अंती १ कोटी ५० लाख रुपये इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर काही वेळातच केलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे क्र. २ गणेश लक्ष्मणराव चव्हाण, वय ३७ वर्षे, पोलीस नाईक ११२१, नेमणुक मानवत पोलीस स्टेशन, जि. परभणी संलग्न उपविभागीय पोलीस अधिकारी, सेलू विभाग, जि. परभणी यांस तक्रारदार यांचे भावाकडुन १० लाख रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद.

नमुद गुन्हयातील तपासाच्या अनुषंगाने यातील आलोसे आलोसे राजेंद्र रामकरण पाल, उपविभागीय पोलीस अधिकारी, सेलू विभाग, जि. परभणी यांच्या मुंबई येथील राहत्या घराची झडती घेतली असता, त्यांचे राहत्या घरात **रुपये २४,८४,०००/— ( चोवीस लाख चौऱ्याऐंशी हजार रुपये)** इतकी बेहिशोबी रोख रक्कम मिळून आलेली आहे. सदरची रक्कम ताब्यात घेण्यात आली असून सदरबाबत पुढील तपास चालू आहे.

**सदर गुन्हयातील यशस्वी सापळा कारवाई स.पो.आ. आबासाहेब पाटील, पो.नि. प्रविण बनगोसावी व पथक तसेच घरझडती कारवाई पो.नि. राहूल कारभारी व पथक यांनी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. लखमी गौतम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.**